# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

# Date – 15 October 2026

# Time 18.10 to 18.20

# Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १५ ऑक्टोबर २०२६ सायंकाळी ६.१०**

****

- साखरेची साठेबाजी रोखून पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी केंद्र सरकारकडून नियमांमध्ये सुधारणा
- एसटी महामंडळाचा दिवाळी निमित्त घेतलेला हंगामी १५ टक्के भाडेवाढीचा निर्णय रद्द
- वीज महावितरण कंपनीचा भविष्यवेधी डिस्कॉम या मुख्य श्रेणीत राष्ट्रीयस्तरावर प्रथम क्रमांक
- भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन सर्वत्र साजरा

आणि

- हिंगोली जिल्ह्याच्या वसमत तालुक्याला पुन्हा भूकंपाचा धक्का

****

सणासुदीच्या काळात साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी आणि साखरेचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी सरकारने साठाविषयक नियमांमध्ये सुधारणा केली आहे. आता साखर व्यापाऱ्यांना फक्त १५ दिवसांपर्यंतच साखर साठवून ठेवता येईल. वितरकांसाठी साखरेचा साठा ठेवण्याची मर्यादाही एक हजार क्विंटल निश्चित करण्यात आली आहे. हे नियम आजपासून येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत लागू राहतील, असं ग्राहक व्यवहार मंत्रालयाकडून सांगण्यात आलं आहे.

****

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेतल्या कथित अनियमिततेच्या विरोधात विरोधी पक्षांनी सर्वोच्च न्यायालयावर काढलेल्या मोर्चाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयानं आज काँग्रेस नेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यासह इतरांना नोटीस बजावली. सर्वोच्च न्यायालयाला धाक दाखवून कुणीही कोणतीही गोष्ट करवून घेऊ शकत नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं. दरम्यान, एसआयआर प्रक्रियेतल्या अनियमितता आणि मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावं यादीतून वगळल्यासंदर्भात दाखल याचिकांवर, न्यायालयानं निवडणूक आयोगाकडून उत्तर मागवलं आहेत. जंतरमंतरचं नाव अधिकृत आंदोलनस्थळांच्या यादीतून काढून टाकायच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिकाही न्यायालयानं स्वीकारली.

****

हिंदू धर्मातून इतर कोणत्याही धर्मात, धर्मांतर करणाऱ्या व्यक्तींना मागासवर्गीय प्रवर्गा अंतर्गत आरक्षणाच्या लाभांवर दावा करता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात तामिळनाडू सरकारने दाखल केलेली याचिका फेटाळून लावताना, न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती चंद्रशेखर यांच्या पीठानं हा निर्णय दिला.

धर्मांतरापूर्वी अनुभवलेला सामाजिक मागासलेपणा धर्मांतरानंतरही कायम राहत नाही, तसंच हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर कोणताही धर्म पाळणारी व्यक्ती अनुसूचित जातीचा दर्जा गमावते, असं न्यायालयानं नमूद केलं.

****

NEET-PG 2026 परीक्षेची उत्तरतालिका आणि उमेदवारांच्या सोडवलेल्या उत्तरपत्रिका जाहीर करण्याच्या प्रक्रियेत अधिक पारदर्शकता असावी, अशी मागणी करणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकार आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाकडून उत्तर मागितलं आहे. न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि न्यायमूर्ती आलोक आराधे यांच्या पीठाने संबंधित प्राधिकरणांना नोटीस बजावली आहे. परीक्षेत विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरं आणि आपण दिलेली उत्तरं, पडताळण्याची संधी प्रत्येक उमेदवाराला मिळावी, असं याचिकाकर्त्यांनी म्हटलं आहे.

****

राज्य शासनाच्या सर्व सेवा नागरिकांना डिजिटल माध्यमातून अखंडपणे मिळण्यासाठी संबंधित विभाग आणि महाआयटी यांनी समन्वयानं काम करण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. विविध सेवांच्या सुसूत्रीकरणासंदर्भात आज मुंबईत झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री बोलत होते. ‘महाडीबीटी, ‘मैत्री आणि ‘आपले सरकार या तिन्ही उपक्रमांच्या दुसऱ्या टप्प्यात, येत्या २६ जानेवारी रोजी डिजिटल सेवा प्लॅटफॉर्मचं लोकार्पण करण्याच्या दृष्टीने सर्व प्रलंबित कामं ३१ डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश, मुख्यमंत्र्यांनी दिले.

****

मानवी तस्करीच्या गुन्ह्यांमध्ये संपूर्ण जाळे उघड करण्यावर भर द्यावा, असं आवाहन पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी केलं आहे. मानवी तस्करीच्या गुन्ह्यांबाबतची न्यायसेतू २०२६ ही राज्यस्तरीय कार्यशाळा मुंबईत पोलीस महासंचालक कार्यालयात झाली, यावेळी दाते बोलत होते. गुन्हा घडू नये यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणं, गुन्हा घडल्यास त्याची तातडीने उकल करणं आणि तपास करताना पीडित व्यक्तीची परिस्थिती समजून घेऊन आधार आणि दिलासा मिळेल, असं वर्तन पोलिसांनी ठेवणं आवश्यक असल्याचं, दाते यांनी सांगितलं.

****

राज्य मार्ग परिवहन – एसटी महामंडळाने दिवाळी निमित्त घेतलेला हंगामी १५ टक्के भाडेवाढीचा निर्णय रद्द केला आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर आणखी भार टाकणं योग्य नसल्याची भूमिका घेत महामंडळाचे अध्यक्ष तथा परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याबाबतचा प्रस्ताव फेटाळून लावल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

वीज महावितरण कंपनीला देशातील भविष्यवेधी डिस्कॉम या मुख्य श्रेणीमध्ये राष्ट्रीयस्तरावर प्रथम क्रमांक मिळाला आहे. महावितरणने यासह तब्बल ७ पुरस्कार पटकावले आहेत. दिल्ली इथं झालेल्या २०व्या राष्ट्रीय ऊर्जा परिषदेमध्ये महावितरणचे संचालक धनंजय औंढेकर यांनी काल हे पुरस्कार स्वीकारले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, हरित ऊर्जेला दिलेलं प्राधान्य आणि वाढत्या विजेच्या मागणीसह भविष्यातल्या आव्हानांना सामोरं जाण्यासाठी केलेल्या धोरणात्मक बदलांमुळे महावितरणची या पुरस्कारांसाठी निवड करण्यात आली.

****

नाशिक इथं येत्या ३१ ऑक्टोबर रोजी सिंहस्थ कुंभमेळ्याचा प्रारंभ होणार आहे, त्यानिमित्ताने त्र्यंबकेश्वर इथं धर्मध्वजारोहण होणार असून या ध्वजस्तंभाचं आज त्र्यंबकेश्वर इथल्या कुशावर्त तीर्थ इथं जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते पूजन करण्यात आलं. ३१ फूट उंच असलेल्या या ध्वजस्तंभावर समुद्र मंथनाची संकल्पना साकारण्यात आली असून, मंथनातून प्राप्त रत्ने ध्वजावर चिन्हित आहेत. कुंभमेळ्याच्या अनुषंगाने त्र्यंबकेश्वर इथं भाविकांच्या गर्दीचे प्रभावी व्यवस्थापन, विविध कामांचं सूक्ष्म नियोजन आणि विकासकामांची निर्धारित वेळेत पूर्तता यांना प्राधान्य देण्यात येत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर संबंधित यंत्रणांनी आवश्यक तयारी वेळेत पूर्ण करावी, अशा सूचना महाजन यांनी केल्या.

****

दिवंगत राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन आज साजरा झाला. मुंबईत मंत्रालयात मराठी भाषा विभागाच्या वतीने विशेष कार्यक्रम पार पडला. मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते. डॉ कलाम यांच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आलं, यावेळी केलेल्या मार्गदर्शनपर भाषणात सामंत यांनी, हा उपक्रम फक्त एका दिवसापुरता मर्यादित न राहता वर्षातील ३६५ दिवस वाचनाची प्रेरणा देणारा असावा, असं प्रतिपादन केलं. मराठी भाषा विभागाच्या वतीने भरवण्यात आलेल्या पुस्तक प्रदर्शन तसंच विक्री केंद्रांना सामंत यांनी भेट दिली.

जळगाव इथं अभिजात मराठी भाषा सप्ताह-२०२६ च्या सांगता सोहळ्यातही डॉ. सामंत यांनी आज मार्गदर्शन केलं. खानदेशातील बोलीभाषांचं जतन आणि संवर्धन करण्यासाठी येत्या सहा महिन्यात कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात बोलीभाषा केंद्र सुरू करण्यात येणार असून, त्यासाठी मराठी भाषा विभाग निधी उपलब्ध करून देईल, अशी ग्वाही सामंत यांनी दिली.

****

डॉ कलाम यांच्या जयंतीनिमित्त आज छत्रपती संभाजीनगर इथं जिल्हाधिकारी कार्यालय तसंच महापालिकेसह विविध शासकीय, शैक्षणिक आणि सामाजिक संस्थांच्या वतीने कलाम यांना अभिवादन करण्यात आलं. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत कुलगुरू डॉ. विजय फुलारी यांनी कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. यावेळी विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. विद्यापीठाच्या ज्ञानस्रोत केंद्रात दुर्मिळ ग्रंथांचं तीन दिवसीय प्रदर्शनही भरवण्यात आलं.

****

केंद्र सरकारच्या सुधारित उडान योजनेअंतर्गत सोलापूर- मुंबई आणि अमरावती-पुणे या हवाई मार्गांची निवड करण्यात आली आहे. केंद्रीय नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी ही माहिती दिली. या दोन्ही मार्गांवर दोन्ही दिशांनी विमानसेवा सुरू करण्याचा प्रस्ताव आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात आज पुन्हा भूकंपाचा धक्का बसला. आज पहाटे ४ वाजून ५८ मिनिटांनी वसमत तालुक्यातल्या खापरखेडा परिसरात भूगर्भातून आवाजासह सौम्य धक्का जाणवला. २ पूर्णांक ९ रिश्टर स्केल इतकी या भूकंपाची तीव्रता होती. प्राथमिक माहितीनुसार, या धक्क्यामुळे कोणत्याही प्रकारची जीवित किंवा वित्तहानी झाली नाही, असं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी देवीच्या शारदीय नवरात्र महोत्सवात आज पाचव्या माळेच्या दिवशी ललिता पंचमी निमित्त श्री तुळजाभवानी देवींची रथ अलंकार महापूजा मांडण्यात आली. धार्मिक आख्यायिकेनुसार भगवान सूर्यनारायण यांनी त्रिलोक भ्रमणासाठी आपला रथ श्री तुळजाभवानी मातेस दिला होता. त्या परंपरेतून आजही रथ अलंकार अवतार पूजेला विशेष महत्व आहे.

****

जागतिक हात धुवा दिनानिमित्त नांदेड जिल्ह्यात अर्धापूर तालुक्यात खैरगाव इथं जनजागृतीपर कार्यक्रम झाला. संसर्ग आणि आजारपण रोखण्यासाठी साबणाने स्वच्छ हात धुणं आवश्यक आहे, असल्याचं, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यू.डी. तोटावाड यांनी उपस्थितांना सांगितलं.

****

इन्स्पायर मानकतर्फे घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आंतरशालेय विज्ञान आणि तंत्रज्ञान स्पर्धेत अहिल्यानगरची श्रद्धा लोंढे हिने सादर केलेल्या दृष्टीहीनांकरता ए-आय-आधारित शिक्षकसहायक या प्रकल्पाला सुवर्णपदक मिळालं आहे. याशिवाय महाराष्ट्रातल्या ७ विद्यार्थ्यांना सुपर सिक्स्टीमधे स्थान मिळालं आहे.

****